कामगार आयुक्त, मुंबई यांच्या आस्थापनेवरील सरकारी कामगार अधिकारी गट-ब या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या नियतकालिक बदल्या.

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,**
**शासन आदेश क्र.बदली-०६२४/प्र.क्र.१०७/कामगार-८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ०४ सप्टेंबर, २०२४.

**वाचा:-** १. "महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५"
२. सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. ६ दि.२९.०८.२०२४.
३. शासन आदेश समक्रमांक दिनांक ३०.०८.२०२४.
४. शासन शुध्दीपत्रक समक्रमांक दिनांक ०२.०९.२०२४.

**शासन आदेश:-**

कामगार आयुक्त यांच्या आस्थापनेवरील सरकारी कामगार अधिकारी (गट-ब) या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सन २०२४ या वर्षातील नियतकालिक बदल्या संदर्भ क्र. ३ येथील शासन आदेशान्वये करण्यात आल्या आहेत. सदर शासन आदेशातील अ.क्र. ७ येथील श्रीम.अ.सु.वाघ, सरकारी कामगार अधिकारी, सातारा यांची नियतकालिक बदलीने पुणे येथे पदस्थापना करण्यात आली होती. तसेच, श्रीम.वाघ यांच्या पुणे येथील पदस्थापनेबाबतच्या कार्यभाराचा उल्लेख सदर आदेशात करणे अनावधानाने राहून गेल्याने, दिनांक ०२.०९.२०२४ रोजी शासन शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात आले होते. त्याअनुंषगाने आता, श्रीम.वाघ यांची संदर्भ क्र.३ येथील आदेशान्वये करण्यात आलेली बदलीने पदस्थापना तसेच, संदर्भ क्र.४ वरील दि.०२.०९.२०२४ रोजीचे शासन शुध्दीपत्रक अधिक्रमित करुन खालीलप्रमाणे सुधारित शासन आदेश निर्गमित करण्यास येत आहे.

२. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४ (४क) मधील तरतूदीनुसार खाली नमूद केलेल्या कामगार आयुक्त, मुंबई यांच्या आस्थापनेवरील सरकारी कामगार अधिकारी, गट-ब या संवर्गातील अधिकाऱ्यांना त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविण्यात आलेल्या पदावर सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने बदलीने पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | सध्याचे कार्यरत ठिकाण | नागरी सेवा मंडळाची शिफारस | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. अ.सु. वाघ | सातारा | सचिव, पुणे माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ, पुणे | रिक्त पदी |

३. सदरील आदेश तात्काळ अंमलात येत असून उपरोक्त नमूद अधिकाऱ्यांना बदलीने पदस्थापना दर्शविण्यात आलेल्या पदावर तात्काळ रुजू होण्यासाठी ते धारण करत असलेल्या पदावरुन या आदेशान्वये कार्यमुक्त करण्यात येत आहे.

४. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियमांनुसार दिलेल्या विहित कालावधीत संबंधित अधिकारी यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी आदेशाच्या दिनांकापासून विहित कालावधीत रुजू होण्याची दक्षता घ्यावी. अन्यथा या पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास, त्यांचा **अनुपस्थितीचा कालावधी हा "अकार्यदिन"** (dies non) **म्हणून गणला जाईल.** तसेच, संबंधिताविरुद्ध सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१८६/१६/कार्यासन-१४,दि.२३.१२.२०१६ मधील तरतूदींनुसार **शिस्तभंगविषयक कारवाई** करण्यात येईल, याची संबंधिताने नोंद घ्यावी.

५. वरील अधिकाऱ्यास नियमानुसार अनुज्ञेय असणारा पदग्रहण अवधी, प्रवास भत्ता व दैनिक भत्ता देय राहील.

६. संबंधित अधिकाऱ्यास शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम-३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्याचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास ते संबंधित अधिकाऱ्यास मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत.

७. उपरोक्त अधिकाऱ्याने पदभार स्विकारल्याचा अहवाल कामगार आयुक्त यांनी तातडीने शासनास सादर करावा.

८. सदरहू आदेशानुसार तात्काळ पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचेविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितानी नोंद घ्यावी.

९. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०९०४१३१०३८५२१० असा आहे. सदर आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS

Digitally signed by SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT,
2.5.4.20=3389518a88af500ef17fd52858804c56d5b0db93ce68c9638764849614f0c8b3, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=824DB7B32ED13AAC7B6F1F11E717770B52D6784F2BC41DDF0E4E9729CDB96F88, cn=SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
Date: 2024.09.04 13:11:03 +05'30'

**( स्वप्निल कापडणीस )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

कामगार आयुक्त, कामगार भवन, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई.

**प्रत,**

१. मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, उ., ऊ., का. व ख. विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३. अपर कामगार आयुक्त, पुणे.
४. कामगार उप आयुक्त (प्रशासन) कामगार भवन, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई.
५. सहायक कामगार आयुक्त, सातारा.
६. अध्यक्ष, पुणे माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ, पुणे.
७. श्रीम.अ.सु.वाघ, सरकारी कामगार अधिकारी (कामगार आयुक्त यांचेमार्फत)
८. महालेखापाल (लेखा परीक्षा/लेखा व अनुदेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
९. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१०. उप सचिव (कामगार-८) यांचे स्वीय सहायक, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
११. निवडनस्ती (कामगार-८).